महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

=====================================================================

जावक क्रमांक —३५७८/४१ दिनांक :- १५ ऑगस्ट, २०२३

प्रसिद्धिपत्रक

# म्हाडा मुख्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण उत्साहात

मुंबई, दि. १५ ऑगस्ट, २०२३- भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) वांद्रे पूर्व येथील गृहनिर्माण भवन या मुख्यालयात 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी पोलीस पथकाने व म्हाडातील सुरक्षारक्षकांनी राष्ट्रध्वजाला सलामी दिली. यावेळी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अरुण डोंगरे, मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री मिलिंद बोरीकर, म्हाडाचे मुख्य अभियंता-२ श्री. सुनील जाधव, मुख्य अभियंता-३ श्री. शिवकुमार आडे, कोंकण मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मारोती मोरे, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. रवींद्र पाटील, 'म्हाडा'चे सचिव श्री. राजकुमार सागर, सह मुख्य अधिकारी श्री. उमेश वाघ, उपमुख्य अभियंता श्री. अनिल अंकलगी, उपमुख्य अभियंता श्री. किशोरकुमार काटवटे, उपमुख्य अभियंता श्री. संतोष बोबडे, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले, दक्षता व सुरक्षा अधिकारी श्री. संजय शिंदे आदींसह म्हाडातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या हस्ते 'म्हाडा'चे अंतर्गत गृहपत्र 'परिसर परिचय'चे अनावरण करण्यात आले. सदर अंकाच्या मुखपृष्ठावर म्हाडाच्या मुंबई मंडळातर्फे सन २०२० मधील गिरणी कामगार सोडतीतील यशस्वी पात्र ४१८ गिरणी कामगार /वारसांना चावी वाटप कार्यक्रमांची छायाचित्रे प्रकाशित करण्यात आली आहेत. शासनाच्या संकल्प पूर्तीचे काही विशेष क्षण मुखपृष्ठावर टिपण्यात आले आहेत. यावर्षीपासून सदर त्रैमासिकाचा अंक डिजिटल अर्थात फ्लिप बुक स्वरूपात कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आला आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण



स्वातंत्र्य दिनानिमित्त महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात ध्वजारोहण करताना म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल. समवेत मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर , मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अरुण डोंगरे, म्हाडाचे सचिव श्री. राजकुमार सागर, कोंकण मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मारोती मोरे, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. रविंद्र पाटील, सहमुख्य अधिकारी श्री. उमेश वाघ, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले.